।। यः क्रियावान् स पण्डितः ।।

।। ज्ञानं बलानां बलम् ।।

स्वररंग

विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आणि
सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड आर्ट्स, पुणे - २
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



# केशवसुत स्मृतिकरंडक
# राज्यस्तरीय स्वरचित काव्यस्पर्धा व काव्यकार्यशाळा
## वर्ष १८

## गुरूवार दिनांक २१ मार्च २०२४

स्थळ : ए. व्ही. हॉल, सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड आर्ट्स,
१३५१, शुक्रवारपेठ, बाजीराव रोड, पुणे ४११ ००२, दूरध्वनी : ०२०-२४४३३०१८
E-mail : smncca@rediffmail.com

## एक दिवसीय काव्यस्पर्धा व कार्यशाळा

नाव नोंदणी सकाळी ९ ते १०.३०

सत्र पहिले : उद्घाटन सकाळी १०.३० ते ११.३०

अध्यक्ष : मा. श्री. प्रसेनजीत फडणवीस

(अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)

उद्घाटक व प्रमुख पाहुणे : प्रा. डॉ. मिलिंद जोशी (लेखक व साहित्यिक)

सत्र दुसरे : कार्यशाळा सकाळी ११.३० ते १२.३०

मार्गदर्शनपर व्याख्यान, डॉ. अंजली कुलकर्णी : कविता निर्मितीची प्रक्रिया

सत्र तिसरे : स्वरचित काव्यस्पर्धा दुपारी १२.३० ते दुपारी ३.३०

परीक्षक : डॉ. वर्षा तोडमल, मा. आश्लेषा महाजन, मा. ज्योत्स्ना चांदगुडे .

**स्नेह भोजन : दुपारी १.३० ते २**

सत्र चौथे : **पारितोषिक वितरण समारंभ दुपारी ४ ते ५**

अध्यक्ष : **मा. प्रा. विनायकजी आंबेकर** (चेअरमन, सरस्वती मंदिर संस्था, पुणे)

शुभहस्ते : **मा. श्री.वैभव जोशी** (सुप्रसिद्ध कवी आणि गीतकार)

**डॉ. अभिजीत कुलकर्णी** (संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, सा. फुले पुणे विद्यापीठ)

## स्पर्धेतील पारितोषिके

प्रथम तीन संघ विजेत्यास : केशवसुत स्मृती करंडक आणि रोख रूपये ४०००, ३०००, २०००

वैयक्तिक प्रथम तीन विजेत्यास : रोख रूपये ३०००, २०००, १०००

स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नाही

## स्पर्धेची नियमावली

१. दोन विद्यार्थ्यांचा एक संघ धरण्यात येईल.

२. एका महाविद्यालयाला कितीही संघ पाठवता येतील.

३. एखाद्या महाविद्यालयातून एकाच विद्यार्थ्याने सहभाग घेतला तर सांघिक पारितोषिकासाठी विचार होणार नाही.

४. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कविता वाचन करताना आपले व महाविद्यालयाचे नाव जाहीर करु नये.

५. स्पर्धेत वाचन करीत असलेल्या कविता इतर कोणी लिहिलेल्या असतील किंवा एखाद्याच्या कविता संग्रहातील असतील असे आढळल्यास संबंधित स्पर्धक बाद ठरविण्यात येतील.

६. स्पर्धेत वाचल्या जाणाऱ्या कविता स्वतः लिहिलेल्या (स्वरचित) आहेत. याबाबतचे हमीपत्र संबंधित विद्यार्थ्याने प्रवेश अर्जावर आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सही-शिक्क्यानिशी स्पर्धेच्या अगोदर संयोजकांकडे द्यावे.

७. संघात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्याला वैयक्तिकरीत्या वेगळा सहभाग घेता येणार नाही.

८. करंडक विजेत्या स्पर्धकांनी आपल्या महाविद्यालयातर्फे करंडक मिळाल्याची पोहच प्राचार्य सरस्वती मंदिर नाईट कॉलेज, शुक्रवारपेठ, पुणे यांच्याकडे त्वरीत पाठवावी.

९. करंडकाची देखभाल जबाबदारी विजेता संघ आणि विजेत्या संघाच्या महाविद्यालयाकडे राहील.

१०. काव्यस्पर्धेच्या परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. स्पर्धा अथवा निकालाच्या संदर्भात संयोजकाकडे तक्रार करता येणार नाही.

११. स्पर्धकांनी आपल्या कविता smncca@rediffmail.com या ई-मेल वर PDF करुन पाठवाव्यात तसेच सोबत कागदावर एकाच बाजूने कविता लिहून आणाव्यात.

१२. स्पर्धकांना केवळ दोनच कविता वाचता येतील. त्यातील पहिली कविता परिक्षणासाठी गृहित धरली जाईल.

१३. स्पर्धकांनी आपले ओळखपत्र व आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे सही शिक्का असलेले प्रवेश अर्ज सोबत आणावे. त्याशिवाय नोंदणी होणार नाही.

१४. कविता फक्त मराठीतच असावी. इतर भाषेतील कविता वाचण्यास अनुमती मिळणार नाही.

१५. स्पर्धकांनी दि. २१/३/२०२४ पूर्वी किंवा याच दिवशी सकाळी ९.०० ते १०.३० या वेळेतच नोंदणी करावी. यानंतर नोंदणी केली जाणार नाही.

१६. आमच्या महाविद्यालयाकडून या काव्यस्पर्धेतील निवडक कवितांचा संग्रह प्रकाशित करण्यात येणार आहे.

**डॉ. अयोध्या जाधव**
विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी
मोबा.९७६७२८५८८८

**प्रा. डॉ. सुनिल शेटे**
प्राचार्य